


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६१९ . वा | बुधवार | दि. ०६ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचारातील गेला माळी कुणीकडे ?

## लाकडे आणि माळीमध्ये भ्रष्टाचार लपवण्यासाठी लपंडाव सुरू...

**पोस्टमार्टम ५२**

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील भ्रष्टाचाराचे प्रकरण आता रोज नवनवे रंग बदलू लागले आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून एकमेका सहाय्य करू, अवघा करू भ्रष्टाचार या उक्तीप्रमाणे अनिर्बंध भ्रष्टाचार करण्यात येत आहे. खरे तर या ठिकाणी होत असलेले गैरप्रकार, भ्रष्टाचार हा एकप्रकारे संघटित गुन्हेगारीचा भाग दिसून येत आहे. परंतु पोलिस प्रशासनाचे याकडे साफ दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. कारण गेल्या अनेक दिवसांपासून रुग्णालय प्रशासनाला माजी रोखपाल पी. के. माळी हे हुलकावणी देत आहेत. एवढेच नाही तर ते आता पोलिसांना देखील गवसेनासे झालेले दिसून येत आहे. त्यामुळे सध्या जिल्हा रुग्णालयात एक प्रश्न विचारला जात आहे. अखेर गेला माळी कुणीकडे? येथील जिल्हा रुग्णालयात सुरू असलेल्या बेबंद भ्रष्टाचाराच्या विरोधात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्हा रुग्णालय सध्याच्या घडीला भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे केंद्र बनले आहे. या ठिकाणी वर्षानुवर्षांपासून प्रचंड असा भ्रष्टाचार होतो आहे. हा भ्रष्टाचार आता एव्हढा व्यापक आणि सखोल झाला आहे की, संपूर्ण जिल्हा रुग्णालय प्रशासन त्यामुळे कुजण्याच्या अवस्थेत पोहोचले आहे. जिल्हा रुग्णालयाचे हृदय समजल्या जाणाऱ्या कॅशबुकात मोठ्या प्रमामात खाडाखोड करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे प्रकरण दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सर्वांत आधी उघड केले होते. विशेष म्हणजे दैनिक जनसंचलन यासंदर्भात पुढाकार घेत नाही, तोपर्यंत हा भ्रष्टाचार राजरोसपणे सुरू होता. परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने या भ्रष्टाचाराचा भंडाफोड केल्यानंतर त्याबाबत किमान चर्चा तरी होऊ लागली आहे. हा भ्रष्टाचार अत्यंत गुप्त पद्धतीने आकाराला येत होता. तत्कालीन रोखपाल पी. के. माळी यांच्या कार्यकाळातील हा भ्रष्टाचार आहे. माळी यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात रुग्णालयाच्या कॅशबुकात खाडाखोड करण्यात आली आहे. तसेच वेगवेगळ्या पद्धतीची अनेक चढ्या दराने बिले काढण्यात आली आहेत. यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे सज्जड पुरावे उपलब्ध आहेत. कालांतराने पी. के. माळी यांची बदली झाली व त्यांनी जिल्हा रुग्णायातील रोखपाल पदाचा पदभार सोडला. त्यानंतर काही महिन्यांनी पी. के. माळी हे सेवानिवृत्त झाले. परंतु बदली होताना व निवृत्त होत नाही त्यांचा अखत्यारीतील हिशोबात जे काही घोळ होते, ते त्यांनी निस्तरले नाहीत. जिल्हा रुग्णालयात विद्यमान रोखपाल लाकडे यांच्याकडे पदभार देताना माळी यांनी अनेक प्रकारे चालबाजी केली. लाकडे यांनीही सर्व हिशेब क्लियर नसतानाही पदभार घेतला. जेंव्हा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने जिल्हा रुग्णालयात झालेल्या भ्रष्टाचाराविषयी माहिती घेणे सुरू केले, तेंव्हा माळी यांनी परिपूर्ण पदभार लाकडे यांच्याकडे सुपूर्द केला नसल्याचे स्पष्ट झाले. मग प्रश्न असा उरतो की, लाकडे यांनी अशाप्रकारे अर्धवट कारभार स्विकारला तरी कसा? आज लाकडे हे अती साळसूदपणाचा आव आणून सांगत आहेत की, मला माळी यांनी पदभार घेताना संपूर्ण माहिती दिली नाही आणि परिपूर्ण असा पदभार सोपवला नाही. मग तेंव्हा लाकडे हे काय झोपा काढत होते का, असा सवाल उपस्थित होतो आहे. जेंव्हा दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने रुग्णालय प्रशासनावर दबाव वाढवला, तेंव्हा हिशोब लावण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने पी. के. माळी यांना अनेकदा सूचित केले. परंतु माळी हे आता सेवानिवृत्त झाल्याने ते बधत नसल्याचे दिसत आहे. अखेर माळी हे जिल्हा रुग्णालयात हजर होत नसल्यामुळे काही दिवसांपूर्वी जिल्हा शल्यचिकित्सकांनी थेट शहर पोलिस स्टेशनला पत्र देऊन माळी यांना तात्काळ हजर करण्याचे निर्देश जारी केले. ही मुदत संपून देखील माळी हे जिल्हा रुग्णालयाचे तोंड पहायला तयार नाहीत. विशेष म्हणजे शहर पोलिसांना पत्र दिल्यानंतर अद्याप पोलिस देखील माळी यांना रुग्णालयात हजर करू शकलेले नाहीत. या सर्व प्रकारावरून हे स्पष्टपणे दिसून येते की, जिल्हा रुग्णालयातील हा भ्रष्टाचार दाबण्याचा सर्वच जण आटापीटा करीत आहेत. जिल्हा रुग्णालय प्रशासन असो की, पोलिस विभाग कोणालाही या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यात रस दिसून येत नाही. एकंदरित भ्रष्टाचार दडपण्याचे पुरेपूर षडयंत्र चाललेले आहे. असे असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र हा भ्रष्टाचार कदापिही दडपू देणार नाही. जोपर्यंत




जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज शांतपणे बसणार नाही. भ्रष्टाचाऱ्यांचा कर्दनकाळ असलेल्या सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा आवाज कोणीही दाबू शकत नाही. जनतेचा एक जागता प्रहरी म्हणून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज यापुढील काळात देखील भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात निकराने लढल्याशिवाय राहणार नाही. जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपयांचे आलेले विविध निधी कागदोपत्रीच ? जिल्हा सामान्य रुग्णालयातील कारोभार म्हणजे आपण सारे भाऊ शासनाचा पैसा पगारी व्यतिरिक्त मिळून खाऊ जिल्हा सामान्य रुग्णालयातील करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून कमावलेला पैसा व्याजासह शासन तिजोरीत दोषी भरत नाही व त्यावर कडक कारवाई होत नाही आमचे हे पोस्टमार्टम सत्र असेच सुरू राहणार

## डॉ. होमीभाभा परिक्षेत सहकर विद्या मंदिरचा चि. शशांक देवकर विदर्भातून सर्वाधिक गुण मिळवित प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण...

**जनसंचलन/बुलढाणा**

मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन च्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेत सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथील चि. शशांक विलास देवकर यांने घवघवीत यश प्राप्त केले. सदर परीक्षा दि.२१ ऑक्टोबर, २०२३ रोजी लेखी स्वरुपामध्ये घेण्यात आली होती. यामध्ये वर्ग ६ वी चा विद्यार्थी चि. शशांक यांने प्रथम स्तरावर ८२ गुण घेऊन विदर्भातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्याची द्वितीय स्तरावरील वर्धा येथे होणाया परीक्षेसाठी निवड झाली आहे. चि.शशांकचे अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमलताई झंवर, प्राचार्य व मुख्याध्यापिका यांनी केले असुन त्याला पुढील परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्यात. चि.शशांकनी त्याच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा,






प्राचार्य, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंदाना दिले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा जिल्ह्याचे लोकप्रिय दैनिक निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहारी जनसंचलनच्या विशेष दिपावली अंकाचे वाचक वर्गाच्या हस्ते विमोचन...









# देवेंद्र फडणवीस ठरतायत भाजपच्या निवडणूक प्रचारातला हुकमी एक्का!...

## मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगडमध्ये फडणवीसांचा प्रचार भाजपला फायदेशीर ठरला...

वृत्तसंस्था/मुंबई

उत्तर भारतातल्या तीन प्रमुख राज्यांमध्ये भाजपने बहारदार विजय मिळवत काँग्रेससह विरोधकांचा धुव्वा उडवला. भाजपच्या प्रचारातल्या अनेक स्टार प्रचारकांनी या प्रचारात मोलाची भूमिका बजावली असून यातल्या एका स्टार प्रचारकाचं महाराष्ट्र कनेक्शन पुढे आलंय. देवेंद्र फडणवीसांनी ४ राज्यांमध्ये मिळून २३ ठिकाणी प्रचार सभा आणि रोड-शो केले होते. यातल्या १४ ठिकाणी भाजपचे उमेदवार मोठ्या फरकाने निवडून आले आहेत. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढमधल्या भाजप विजय साकार करण्यात मोलाची भूमिका बजावणारे नेते म्हणून महाराष्ट्राच्या देवेंद्र फडणवीसांचं नाव पुढे येतंय. फडणवीसांनी विधानसभा निवडणूक रणधुमाळीच्या काळात ४ राज्यांत घेतलेल्या २३ प्रचारसभा आणि रोड-शो घेतले होते. त्यांच्या या सभांना रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती. तसंच, प्रत्यक्ष प्रचारसभा आणि रोड-शोंव्यतिरिक्तही याठिकाणी देवेंद्र फडणवीसांनी स्थानिकांच्या थेट भेटी घेऊन चर्चा केल्या होत्या. याचं थेट फळ निवडणूक निकालांमध्ये भाजपला मिळा-लेलं दिसलं. फडणवीसांनी घेतलेल्या २३ प्रचारसभा आणि रोड-शोंपैकी १४ ठिकाणी भाजपला यश आलंय. २३ठिकाणीप्रचारआणि१४ठिकाणीविजय देवेंद्र फडणवीस यांच्या ४ राज्यात सभा आणि भाजपा विजयी झालेल्या जागांची माहिती पुढे आली आहे. मध्यप्रदेशात एकूण ८ मतदारसंघात त्यांचे झंझावाती दौरे झाले. यात धार, इंदोरचे ३ मतदारसंघ, महू, बुरहाणपूर असे मतदारसंघ ६ भाजपने जिंकले. राजस्थानमध्ये फडणवीसांनी प्रचार केलेल्या एकूण ६ मतदारसंघांपैकी केसरी, नासिराबाद, अजमेर उत्तर, सांगानेर अशा ४ जागा भाजपला मिळाल्या. तर छत्तीसगढमध्ये त्यांनी प्रचार आणि रोडशो ५ मतदारसंघात केले. यापैकी रायपूर दक्षिण, रायपूर उत्तर, रायपूर पश्चिम, रायपूर ग्रामीण इथे भाजप विजय साकार केला. तेलंगणामध्ये मात्र, ४ ठिकाणी प्रचार करूनही एकाही ठिकाणी भाजपला विजय मिळवला नाही. विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत देवेंद्र फडणवीसांचं कार्ड प्रभावीपणे चालत असल्याचं लक्षात आल्याने केंद्रीय भाजपने त्यांना पुढे केल्याचं राजकीय जाणकारांचं मत आहे. बिहार, गोवा राज्यांमध्ये प्रचाराची कमाल दाखवलेल्या फडणवीसांनी उत्तर भारतात पुन्हा एकदा आपल्या नेतृत्व कौशल्याची चुणूक दाखवल्याची चर्चा सध्या पक्षात सुरू आहे. त्यांनी प्रचार केलेल्या मतदारसंघांमध्ये भाजपच्या मतांची टक्केवारी वाढल्याचं पुढे येतंय. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगडमध्ये भाजपचे स्टार प्रचारक देवेंद्र फडणवीस यांनी झंजावाती दौरे केले होते. २०१४ साली देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यापासूनच त्यांच्याभोवती महाराष्ट्रासह राज्याच्या राजकारणात एक वलय प्राप्त झालंय. याचा फायदा भाजप-



ला यावेळच्या प्रचारसभांसाठीही झाला. राजकीय जाणकारांकडून आणि काही सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फडणवीसांनी योग्य ठिकाणी प्रचारासाठी जाण्याचं सुतोवाच केल्याचं समजतंय. देवेंद्र फडणवीस यांनाच पसंती का? देशातल्या राजकारणात आश्वासक नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या देवेंद्र फडणवीस यांना आता पक्षातूनही तितकीच ताकद मिळतेय. त्यामुळेच सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत देवेंद्र फडणवीस यांना भाजपने पुढे केल्याचं राजकीय जाणकारांचं मत आहे. भाजपच्या केंद्रातल्या महत्त्वाच्या बैठका - निर्णयांमध्ये स्वतः देवेंद्र फडणवीस सहभागी असतात. म्हणून अलिकडेच त्यांच्या दिल्ली वाऱ्याही वाढल्याचं दिसून आलंय. मात्र, त्यांचा सगळा भर हा महाराष्ट्रावरच असून सध्याच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असले तरी महत्त्वाचे निर्णय तेच घेत असल्याची चर्चा राज्याच्या राजकारणात नियमित होत असते. त्यामुळे एकनाथ शिंदे सरकारचे आधारस्तंभ असलेले फडणवीस केंद्रीय भाजपमध्येही महत्त्वाचे नेते म्हणून उदयाला येत आहेत.

# समाजसेविका सुरेखाताई तुकाराम भोसले यांना रेस रिलेशन बोर्ड आणि बोर्ड पॉवर ए.सी.भारत सरकार राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त...



वृत्तसंस्था/पुणे

कोल्हापूर येथे सौ.सुरेखाताई तुकाराम भोसले यांना ए.सी भारत सरकार राष्ट्रीय पुरष्कार देण्यात आला , सामाजिक क्षेत्रात काम करून अनेक गरीब कुटूंना न्याय मिळून देण्याचं प्रयत्न करतात जिल्हा पुणे ता. हवेली नायगाव या खेड्या गावात राहणारी सुरेखा-ताई आपल्या सासुबाई आदर्श माता शेवराई ज्ञानदेव भोसले यांच्या हातात पुरस्कार दिले आणि सासुबाई आदर्श माता शेवराबाई यांच स्वपन पूर्ण करणायचं प्रयत्न करते त्यांनी सांगिल की हा सन्मान माझा नसून माझ्या आई बाबाचा आणि सासुबाई आदर्श माता शेवराबाई ज्ञानदेव भोसले व ज्ञानदेव भोसले आहे यांचा मला आशिर्वाद आहे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १५ लोकांना ए.सी भारत सरकार राष्ट्रिय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमात मध्यवर्ती कारागृहाचे उप अधीक्षक रावसाहेब आडे, विनायक गायकवाड, डॉ म्याडी तामगावकर, प्रॉ डॉ प्रतीक मुणगेकर, शिवराज पाटील, शैलजा दुणुंग हे उपस्थीत होते या कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष डॉ म्याडी तामगावकर यांनी केले होते, तर या कार्यक्रमाचे निवेदक आर जे स्वप्नील पन्हाळकर यांनी पाहिले कारागृहाचे उप अधीक्षक रावसाहेब आडे यांनी कार्यक्रमात पुरस्कृत्याना मार्गदर्शन व शुभेच्छा दील्या प्रमूख पाहुण्याचे आभार डॉ म्याडी तामगावकर यांनी मानले सौ.सुरेखाताई तुकराम भोसले यांना पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# मोताळा येथे विधवा परिषदेची नियोजन बैठक..

## चला विधवांना मदत मिळवून देवू --प्रतिभा भुतेकर

**जनसंचलन/मोताळा**

बुलढाणा येथे शिवसाई परिवार व मानस फाउंडेशन कडून विधवा,परित्क्ता महिला परिषद १० डिसेंबर रोजी शिवसाई ज्ञानपीठ,तुळसी नगर, बुलडाणा येथे आयोजन केली आहे . या महिलांना त्यांचे हक्क व जोडीदार मिळवून देणे आपले सामाजिक कर्तव्य ठरते.या साठी पुढाकार घ्यावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा भुतेकर यांनी आज केले. कार्यक्रमाच्या प्रचार प्रसारासाठी आयोजित मोताळा येथील बैठकमध्ये त्या बोलत होत्या. यावेळी परिषदेचे संकल्पक प्रा डी एस लहाने उपस्थित होते.

भारतीय समाजात जेव्हा महिला विधवा होते तेव्हा तिला असंख्य अशा अनिष्ट रूढी परंपरा व चालीरितीना सामोरे जावे लागते. पति वारल्यानंतर किंवा पतीपासून विभक्त झाल्यानंतर तिला अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली जाते.घरात होवू घातलेल्या



मंगल कार्यात तिला दुय्यम स्थान देण्यात येते. तिला पुढाकार घेऊ दिला जात नाही एवढच नव्हे तर पुरूषांपेक्षा तिच्याच घरातील दुसरी महिला तिला दुय्यम वागणूक देत असतात.एकल महिला सक्षम बनविणे, तिला समान दर्जा,समान संधी, समान स्वातंत्र्य मिळवण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे असे प्रतिभा भुतेकर यांनी सांगितले. विधवा, परितक्ता,, घटस्फोटीता ,प्रौढ कुमारिका इत्यादी महिला व त्यांच्या नातेवाईकांनी उपस्थित राहावे असे अवाहन त्यांनी केले,. यावेळी मुख्य आयोजक डि एस लहाने यांनी अयोजना मागची भुमिका विषद कर्ली. यावेळी रामेश्वर पाटील,उमेश कोळसे, दिलीपराव गायकवाड, सार-ोळा सरपंच पवार, उमेश कोळसे भुषण वानखेडे, अविनाश वाकोडे , मोबिन सर. रामदास पाटिल, संदिप वानखेडे, गौरव देशमुख. कडूबा सोनूने, प्रमोद भाउ, , संदिप जाधव,इत्यादी व ईतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# एकनिष्ठा फाउंडेशनला भटिंडा पंजाबला मिळाला राष्ट्रीय पुरस्कार...

**जनसंचलन/ खामगांव**

येथील सेवेत सदैव अग्रेसर असलेल्या एकनिष्ठा गौ-सेवा रक्तसेवा फाउंडेशनला राष्ट्रीय स्तरावर नेशनल सेव द ह्युमैनिटी अवॉर्ड नी सन्मानित करण्यात आले. ही संस्था खामगांव बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्र मध्ये रक्तदान, बेवारस, दिव्यांग गरजू वंत रुग्ण लोकांना उपचारासाठी आर्थिक मदत व तसेच गौ-सेवा कार्यात अविरत सेवा देत आहे. या कामाची दखल पंजाब राज्यामधील भटिंडा शहरामध्ये दिनांक २ डिसेंबर रोजी आयोजित सन्मान समारोह मध्ये घेण्यात आली. या सन्मान समारोह नेपालसह भारत देशातील संपूर्ण राज्यातील २०० संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दयालसिंह सोढी आणि भटिंडाचे लाडके आमदार जगरूप सिंह होते. रक्तदान क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सम्मान करण्यात आला हे पुरस्कार हेल्प निडी फाउंडेशन संस्थापक आनंद जैन सर यांनी भारतात रक्तदान क्षेत्रात निःस्वार्थ रक्तसेवा देणाऱ्या रक्तदात्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये बुलढाणा जिल्हातील खामगांव येथील सुरज शिवमुरत यादव यांना राष्ट्रीय पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले एकनिष्ठा फाउंडेशनचे रक्तनायक गोपाल धोटे, योगेश राऊत, सुनिल कौलकर, सतिष धोटे भटिंडा पंजाब येथे रक्तदान केले. यांचा सुद्धा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. एकनिष्ठा फाउंडेशन २०१३ पासून रक्तदान क्षेत्रात कार्य करीत आहेत पुढे जात असतांना २९ डिसेंबर २०१३ रोजी सुरज यादव यांनी एकनिष्ठा गौ-सेवा रक्तसेवा फाउंडेशनची स्थापना केली. एकनिष्ठा फाउंडेशन पदाधिकारी, सदस्य, रक्तदाते कोणत्याही रुग्णाला रक्त मिळाले नाही म्हणुन दगाऊ नये यासाठी काम करत असतात आता पर्यंत एकनिष्ठा रक्तदात्यांची अविरत नि:शुल्क सेवा सुरू आहे व सुरू राहणार एकनिष्ठा फाउंडेशनला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला यांचा सर्व श्रेय मी माझ्या मित्र मंडळी टीमला देतो व भविष्यात पण आपली अशीच साथ राहील ही अपेक्षा करतो अशी माहिती योगेश राऊत यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# तूर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या अळीचे एकात्मिक व्यवस्थापन करा-कृषि विभागाचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि वातावरणातील बदलामुळे सध्या तूर पिकांवर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढला असून, शेतकऱ्यांनी वेळीच एकात्मिक व्यवस्थापन करून अळीवर नियंत्रण मिळविणे आवश्यक असल्याचे कृषि विभागातर्फे शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे. शेंगा पोखरणारी अळी ही तूर पिकावर किडीची मादी पतंग तुरीच्या कळ्या, फुले व शेंगांवर अंडी घालते. अंड्यातून निघालेल्या अळ्या तुरीच्या कळ्या आणि फुले खाऊन नुकसान करतात. पूर्ण वाढ झालेली अळी ३०-४० मि.मी. लांब विविध रंग छटात दिसून येते. जसे की पोपटी, फिक्कट गुलाबी व करड्या रंगाची असून, तिच्या पाठीवर तुटक करड्या रेषा असतात. मोठ्या अळ्या शेंगांना छिद्र करून आतील दाणे खातात. शेंगमाशीची अळी बारीक गुळगुळीत व पांढऱ्या रंगाची असून, तिला पाय नसतात. तोंडाकडील भाग निमुळता व टोकदार असतो, ही अळी शेंगाच्या आत राहून शेंगातील दाणे अर्धवट कुरतडून खाते व त्यामुळे दाण्याची मुकणी होऊन शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. पिसारी पतंगाची अळी १२.५ मि.मी. लांब हिरवट, तपकिरी रंगाची असते. तिच्या अंगावर सूक्ष्म काटे व केस असतात आणि शेंगेवरील साल खरडून छिद्र करते व बाहेर राहून दाणे पोखरते.

या तिन्ही किडी कळ्या फुले व शेंगावर आक्रमण करीत असल्यामुळे त्यांच्या एकात्मिक व्यवस्थापनाने नियंत्रण मिळवून उत्पन्नातील घट टाळता येऊ शकते. त्यामुळे शेतकरी बांधवांनी वेळीच एकात्मिक व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी जवळजवळ सारखेच उपाय योजावे लागतात.




प्रति हेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावे. त्यामुळे पक्षी किडींच्या अळ्या खाऊन फस्त करतात. पहिली फवारणी ही पिक ५० टक्के फुलोऱ्यावर असताना निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडेरेक्टीन ३०० पी.पी.एम. ५० मिली. किंवा अझाडेरेक्टीन १५०० पी.पी.एम. २५ मिली. किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. दुसरी फवारणी ही पहिल्या फवारणी नंतर १५ दिवसांनी इमामेक्टींन बेंझोएट ५ एस.जी. ३ ग्रॅम किंवा क्लोरॅनट्रानीप्रोल ५ टक्के एस.सी. २.५ मिली. किंवा फ्लूबेन्डामाईड २० टक्के डब्ल्यू. जी. ५ ग्रॅमपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अळ्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे, त्यामुळे झाडावरील अळ्या पोत्यावर पडतील व शेतकऱ्यांनी त्या गोळा करून नष्ट कराव्यात. अचानक घडलेल्या तापमानामुळे, अवकाळी पावसामुळे तसेच धुक्यामुळे तुरीच्या फुलांची अतिरिक्त गळ होऊ शकते व पाने तसेच शेंगा करपू शकतात, अशा परिस्थितीत शक्य झाल्यास संध्याकाळी शेतात धूर करून शेतात तापमान राखण्याची व्यवस्था करावी. धुक्यामुळे होणाऱ्या संभाव्य बुरशीच्या प्रादुर्भावाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी कार्बेंडाझीम, मॅन्कॉझेब या मिश्र बुरशीनाशकाची २५ ते ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तूर पिकातील मर व मूळकुज रोगांचा प्रादुर्भाव हा जमिनीत अतिरिक्त पाणी साचल्यामुळे होऊ शकतो. त्याकरिता शक्य झाल्यास फवारणी पंपाचे नोझल काढून जमिनीत ओल असताना साधारणतः १ ते २ लिटर ट्रायकोर्डमा एकरी २०० लिटर पाण्यात घेऊन जमिनीत मुळाजवळ आळणी करावी आदी उपाययोजना करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व कृषि विज्ञान केंद्र यांनी केले आहे.

# शिवसाई च्या तीन खेळाडूंची शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड...



**जनसंचलन/बुलढाणा**

नुकत्याच संपूर्ण महाराष्ट्रात शालेय स्पर्धेचे आयोजन सुरू आहे महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनाय पुणे यांच्या द्वारा आयोजित शालेय राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेचे आयोजन अमरावती या ठिकाणी करण्यात आले होते या स्पर्धेत अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करत राज्यस्तरीय स्पर्धेत वयोगट अंडर १७ मध्ये मानव गणेश जाधव याने सुवर्णपदक संपादन केले तर अंडर १९ मध्ये विहीर नितीन अपार याने देखील सुवर्णपदक प्राप्त केले शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. वयोगट १७ वर्षे व १९ वर्षे दोन्ही गटाच्या राष्ट्रीय स्पर्धा गुजरात घटक राज्यात नाटियाड या ठिकाणी ९ डिसेंबर पासून आयोजित होत आहे या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील खेळाडूंची प्रशिक्षण अमरावती या ठिकाणी सुरू आहे दोन्ही खेळाडू आपल्या प्रशिक्षणासाठी अमरावती या ठिकाणी दाखल झाले आहे. त्यासोबतच नुकत्याच १४ वर्षातील विदर्भ राज्याचा संघ देखील जाहीर झाला आहे या संघात देखील शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूलचा ऋषिकेश टेकाळे याची १४ वर्षातील मुलांच्या खो-खो संघात निवड झाली आहे. यांच्या राष्ट्रीय स्पर्धा ह्या बेंगलोर या ठिकाणी दिनांक ११ तारखेपासून संपन्न होणार आहे. ऋषिकेश देखील आपल्या प्रशिक्षणासाठी चंद्रपूर या ठिकाणी रवाना झाला आहे. या सर्व खेळाडूंच्या यशाबद्दल शिवसाई युनिव्हर्सल जुनियर कॉलेज चे संचालक डी एस लहाने सर व प्राचार्य प्रमोद मोहरकर सर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. तर शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त टिए सोर सर यांनी ऋषिकेश ला स्पर्धेसाठी एक भेटवस्तू देऊन ऋषिकेश चे अभिनंदन केले. या सर्व खेळाडू सोबत बोलताना आपण आपल्या राज्याला सुवर्णपदक प्राप्त करून द्याल अशी आशा व्यक्त केली. खेळाडूंनी आपल्या यशाचे आई वडील क्रीडा शिक्षक उबाळे सर व प्रशिक्षक चंद्रकांत इलक सर यांना दिले.

# मोदी लाट आहे ना.. मग लोकसभेची निवडणूक बॅलेट पेपरवर घेऊन दाखवा, उद्धव ठाकरे यांचं चॅलेंज

वृत्तसंस्था/मुंबई

नुकत्याच पार पडलेल्या चार राज्यांच्या निवडणूक निकालानंतर देशात मोदींची मोठी लाट असल्याची चर्चा आहे. पण मला त्यांना सांगायचंय की तुमची देशात एवढीच जर लाट आहे तर त्या लाटेमध्ये एकच निवडणूक बॅलेट पेपरवर घेऊन दाखवा, असं खुलं आव्हान देत भाजपला मिळालेल्या विजयावर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शंका उपस्थित केली. त्याचवेळी उद्धव ठाकरे यांनी लांबलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीवरून सरकारला लक्ष्य केलं.

मुंबईतील नरीमन पॉईंट येथील शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या शिवालय या कार्यालयाचं नुतनीकरण करण्यात आलं आहे. याच्या उद्घाटनप्रसंगी उद्धव ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी धारावी पुनर्विकास प्रकल्प, चार राज्यांचा निवडणूक निकाल तसेच निवडणुकीत बॅलेट पेपरचा आग्रह अशा मुद्द्यांवर भाष्य केलं.उद्धव ठाकरे म्हणाले, तुमची देशात एवढीच जर लाट आहे तर त्या लाटेमध्ये एकच निवडणूक बॅलेट पेपरवर घेऊन दाखवा. म्हणजे आमच्या मनात शंका नको. सगळे वातावरण विरोधात असताना, एक्झिट पोलच्याही पलीकडे जाऊन उलटा-पालटा निकाल कसा लागला? हे कसे घडले? असा प्रश्न मतदारांना पडणार असेल तर त्यांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी दम असेल तर एकच निवडणूक बॅलेट पेपरवर घ्या, असं आव्हानच उद्धव ठाकरे यांनी दिलं.चार राज्यांच्या निवडणुकीत भाजपला भरघोस यश मिळालं आहं. माझं त्यांना आव्हान आहे की, पहिल्यांदा मुंबई महापालिकेची निवडणूक घ्या. महापालिकेची निवडणूक वर्ष ते



दीड वर्षे पुढे ढकलली आहे. सिनेटची निवडणूक लांबवली जात आहे, दम असेल तर निवडणुका घेऊन दाखवा, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

# आरक्षणाची गॅरंटी कुणाला मिळणार? हिवाळी अधिवेशनात सरकारची अग्निपरीक्षा...

वृत्तसंस्था/नागपूर

मोदीच आमची गॅरंटी म्हणत, तीन राज्यांमधील विजयाचे टॉनिक घेऊन विधिमंडळाच्या मैदानात उतरणाऱ्या महायुतीच्या सरकारची उद्या, गुरुवारपासून सुरू होत असलेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनात आरक्षणाच्या मुद्यावरून अग्निपरीक्षा होणार आहे. आरक्षणाची गॅरंटी कुणाला द्यायची आणि कशी द्यायची हा कळीचा मुद्दा असणार आहे. पावसाळी वातावरणात होणाऱ्या राज्याच्या हिवाळी अधिवेशनाकडे सगळ्या राज्याचे लक्ष लागले आहे. मराठा समाज, धनगर समाज आरक्षणाकडे डोळे लावून बसला आहे. ओबीसी समाज आपल्या कोट्यातून आरक्षण दिले जाऊ नये म्हणून दक्ष आहे. आरक्षण द्यायचे आहे, कुणाचे कमी करायचे नाही. मग द्यायचे कसे यावर विचारमंथन करताना सरकारचा कस लागणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वातील मराठा समाजाचे आंदोलन, छगन भुजबळ यांच्या नेतृत्वातील ओबीसी आंदोलन यांचा बाहेरून दबाव राहणार आहे. त्यातच विधिमंडळात आमदारांकडून रेटल्या जाणाऱ्या मागणीचे पडसाद उमटतील. तीन राज्यातील सत्तेने भाजपचा उत्साह वाढलेला आहे. काँग्रेस नाउमेद आहे. विधानसभेतील विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले होम ग्राउंडवर सामना खेळणार असल्याने त्यांचा अटॅक कसा असेल आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घरच्या मैदानावरची खेळी कशी असेल याकडे लक्ष लागले आहे.

आमदार आपत्रतेची सुनावणी ७ नोव्हेंबरपासून नागपुरात सुरू होणार आहे. तीन टप्प्यात ही सुनावणी चालणार आहे. सगळे आमदार हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने नागपुरात हजर राहणार असल्याने सुनावणी सोपी होणार आहे. या निमित्ताने नामवंत वकिलांची फौज नागपुरात दाखल होईल. मुंबईत ही सुनावणी सेंट्रल हॉलमध्ये होत होती. नागपुरात ती कुठे घ्यावी याबाबत पेच आहे.



प्रारंभी कॅबिनेट हॉलमध्ये घेण्याचे ठरले होते. ऐनवेळी मंत्रिमंडळाची बैठक आयोजित केली तर या सुनावणीत बाधा येऊ शकते. त्यामुळे नव्या जागेचा शोध सुरू आहे. चौकशी विधिमंडळ परिसरातच व्हावी असे प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

बुलढाणा शहरात व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल (पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# एसटी बस व मालवाहू वाहनाची धडक; २० विद्यार्थ्यांसह ४७ प्रवासी जखमी...

जनसंचलन/बुलढाणा

एसटी बस व मालवाहू वाहनाची धडक; २० विद्यार्थ्यांसह ४७ प्रवासी जखमी लाखनवाडा ते उदयनगर रोडवरील घटना सकाळी लखनवाड्यावरून उदयनगर च्या दिशेने एसटी बस जात असताना पिंप्री कोरडे नजीक ५ डिसेंबर रोजी सकाळी ही दुर्घटना घडली. सविस्तर वृत्त अशे की भरधाव मालवाहू वाहन व महामंडळाच्या बसची समोरासमोर धडक झाल्याने दोन्ही चालक गंभीर जखमी झाले. तसेच बसमधील विद्यार्थी व प्रवासी सुद्धा जखमी झाले. पिंप्री कोरडे नजीक सकाळी ही दुर्घटना घडली. खामगाव एसटी बस आगाराची ही बस २० विद्यार्थ्यांसह ४७ प्रवासी घेऊन उदयनगर कडे निघाली होती. दरम्यान, पिंप्री धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहनांचे समोरील भागाचे मोठ्या प्रमाणात मध्ये



नुकसान झाले. यामुळे दोन्ही चालक गंभीर जखमी झाले तर विद्यार्थी व प्रवासी किरकोळ जखमी झाले. या अपघाताची माहिती मिळताच या ठिकाणी पोलीस स्टेशनची कर्मचारी व महामंडळाचे कर्मचारी घटनास्थळी धाव घेतली.

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | Rates | Height | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/-<br>15 Day=3500/-<br>7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

### One Day

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Rate | Height | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com